जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठाचा आयसीएआयसमवेत सामंजस्य करार

## शिक्षण, व्यावसायिक ज्ञान व कौशल्याची होणार देवाण-घेवाण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा नवी दिल्ली येथील दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटस् ऑफ इंडिया संस्थेसमवेत नुकताच सामंजस्य करार झाला. शैक्षणिक व व्यावसायिक ज्ञान व कौशल्याची देवाण-घेवाण यामुळे विद्यार्थी व शिक्षकांना या सामंजस्य कराराचा लाभ होणार आहे.

नवी दिल्ली येथे नॅशनल एज्युकेशन समिट ऑफ कॉमर्स अँड अकाऊंटन्सी २०२४ (नेस्का-२०२४) या दोनदिवसीय उपक्रमाच्या पहिल्या दिवशी सामंजस्य करार समारंभ झाला. शिवाजी विद्यापीठातर्फे वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते. सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटस् ऑफ इंडियाचे सेक्रेटरी डॉ. जयकुमार बत्रा यांनी स्वाक्षरी केल्या. करारासाठी इन्स्टिट्यूटचे उपसंचालक डॉ. एन.एन. सेनगुप्ता आणि अधिष्ठाता डॉ. महाजन यांनी समन्वयाचे कार्य केले आहे.



**कोल्हापूर : नवी दिल्ली येथील इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटस् ऑफ इंडिया संस्थेसमवेत सामंजस्य करारप्रसंगी डॉ. ज्योती बत्रा, सी. ए. रणजितकुमार अग्रवाल, डॉ. श्रीकृष्ण महाजन, दयानिवास शर्मा.**

वाणिज्य विषयातील पदवी, पदव्युत्तर व पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक सहकार्य करण्याचे ठरविण्यात आले. त्या माध्यमातून या संस्थांच्या बौद्धिक जीवन व सांस्कृतिक विकास याबाबत सहकार्य केले जाईल. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने इन्स्टिट्यूट विशेष सत्रांचे आयोजन करून विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याच्या कामी सहकार्य करणार आहे. संशोधन प्रकल्प, शिक्षक विकास कार्यक्रम तसेच क्षमता विकास कार्यक्रम, कार्यशाळा, परिषद व चर्चासत्र असे शैक्षणिक कार्यक्रमही संयुक्तपणे आयोजित करण्यात येणार आहेत. या कराराचा विद्यापीठाचे विद्यार्थी, शिक्षकांनाही मोठा लाभ होईल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2024
तरुण भारत

# 'आयसीएआय'सोबत विद्यापीठाचा सामंजस्य करार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा नवी दिल्ली येथील दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडियाबरोबर सामंजस्य करार झाला आहे. या कराराचा विद्यापीठाचे विद्यार्थी तसेच शिक्षकांनाही लाभ होईल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

- **शैक्षणिक विकास, संशोधनासंदर्भात देवाण—घेवाण**

नवी दिल्ली येथे नुकतीच नॅशनल एज्युकेशन समिट ऑफ कॉमर्स अँड अकौंटंसी २०२४ (नेस्का–२०२४) या दोनदिवसीय उपक्रमाच्या पहिल्या दिवशी सामंजस्य करार समारंभ पार पडला. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते. या सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडियाचे सेक्रेटरी डॉ. जयकुमार बत्रा यांनी स्वाक्षरी केल्या. हा करार होण्यासाठी इन्स्टिट्यूटचे उपसंचालक डॉ. एन. एन. सेनगुप्ता आणि अधिष्ठाता डॉ. महाजन यांनी समन्वयाचे कार्य केले. दोन्हीही संस्थांनी शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण यामध्ये केलेल्या कार्यातून ज्ञान आणि कौशल्यासंदर्भात एकत्रित काम करण्याचा निर्णय घेतला आहे. वाणिज्य विषयातील पदवी, पदव्युत्तर व पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक सहकार्य करण्यांचे ठरविण्यात आले. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने इन्स्टिट्यूट विशेष सत्रांचे आयोजन करून विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी सहकार्य करणार आहे. संशोधन प्रकल्प, शिक्षक विकास कार्यक्रम तसेच क्षमता विकास कार्यक्रम आणि कार्यशाळा, परिषद व चर्चासत्र असे शैक्षणिक कार्यक्रमही संयुक्तपणे आयोजित करण्यात येतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त आज विशेष व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, नेहरू अभ्यास केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधीजींच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवार (दि.३०) रोजी 'नई तालीम : भारतीय शिक्षणाचा प्रयोग' विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती गांधी अभ्यास केंद्र समन्वयक प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी दिली. विद्यापीठातील शाहू सभागृह येथे सकाळी १०.३० वाजता विशेष व्याख्यान होणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून गांधीवादी विचारवंत एस. के. एच. स्वामी, ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. प्र- कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. पी. एम. चौगुले आदी उपस्थित राहणार आहेत.

लोकमत

# विद्यापीठात आज स्वामी यांचे व्याख्यान

कोल्हापूर : महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र, दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्र, नेहरू अभ्यास केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्यातर्फे गांधीवादी विचारवंत एस. के. एच. स्वामी व ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांचे नई तालीम : भारतीय शिक्षणाचा प्रयोग यावर आज, मंगळवारी विशेष व्याख्यानाचे आयोजन केले आहे. शाहू सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के आहेत. यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्र समन्वयक प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या ५९८ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या ५९८ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठ हिवाळी सत्राच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल), बॅचलर ऑफ लॉ (फाईव्ह इयर) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेला १२९९ विद्यार्थी बसले त्यापैकी ११७ विद्यार्थी अनुपस्थित होते.

दरम्यान, दि. २९ रोजी बी. फार्म अभ्यासक्रमांच्या विविध सत्रांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

30 JAN 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘मॉस’ टिकवेल पश्चिम घाटाचा ‘श्वास’

## जंगले, शेतीपिकांसाठी मातीची निर्मिती : अन्नसाखळीतही उपयुक्त

**कोल्हापूर : शेवाळवर्गीय वनस्पती पाण्यात तर नेचेवर्गीय वनस्पती जमिनीत वाढते. अशावेळी जमीन-पाणी दोन्हींमध्ये मॉसवर्गीय वनस्पती वाढतात, म्हणून मॉसला ‘उभयचर’ असे म्हणतात. पावसाळ्यात तुमच्या घराच्या भिंतीवर हिरवेगार लॉन पाहिले असेल, तोच मॉसचा एक प्रकार. जिथे ओलसर जागा, सावली असते, तिथे मॉस वाढतात. मॉस हे जमीन, जंगले, शेतीपिकांसाठी आवश्यक माती तयार करते. हवामान बदल, जंगलतोड, वाढते तापमान, कमी पाऊस आदींमुळे मॉसच्या अधिवासांवर परिणाम होऊ लागला आहे, म्हणून पश्चिम घाटासाठी तर मॉस जगलेच पाहिजे, तरच कोल्हापूर जिल्हा तगेल आणि जिल्ह्यातील जंगले, शेतीही.**

**- अमोल सावंत**



मॉस वनस्पीचे प्रकार

### माती, जंगलांची निर्मिती

खडक कठीण असतात, पण खडक हळूहळू फोडून त्यापासून माती तयार करण्याचे काम मॉस वनस्पती करतात. माती तयार करून नवीन वनस्पती त्यावर येण्यासाठी मॉस मदत करते. काही मॉस वर्गीय वनस्पती दगडांवर आढळतात. ही मॉस मुळांसारख्या सूक्ष्म अवयवातून

विशेष

काही स्राव दगडांवर सोडतात. मग कठीण असा दगड झिजायला सुरुवात होते. दगडांपासून माती तयार होऊ लागली की, कालांतराने जिथे ही माती पडलेली असते त्या जमिनीचे रुपांतर जंगलांमध्ये होते. हीच माती पिकांसाठी उपयुक्त ठरते.

### प्राण्यांसाठी अन्न

मॉस वनस्पीतील काही प्रजाती या जंगलातील शाकाहारी प्राणी खाद्यान्न म्हणून वापर करतात. शाकाहारी सस्तन खुरधारी प्राणी, अल्पाईन पृष्ठवंशीय प्राणी, रेनडिअर, कस्तुरी मृग, बैल, उंदीर, खारी, शेळ्या-मेंढ्या, काही पक्षीही मॉसवर जगतात. पश्चिम घाटात एखादे भलेमोठे झाड जेव्हा तोडले जाते किंवा नष्ट होते, तेव्हा या झाडांवरील अपुष्प वनस्पतींबरोबर मॉसच्या ४० प्रजाती नष्ट होतात, म्हणजे अन्नसाखळीतील महत्त्वाचे घटक लुप्त झाले की उर्वरित अन्नसाखळीला धोका निर्माण होतो.

### शिवाजी विद्यापीठाचे संशोधन

अपुष्प वनस्पतींचे (ब्रायोफायटा) संशोधन करण्यासाठी महाराष्ट्र अन् भारतातील विद्यापीठांमध्ये संशोधक, तज्ज्ञ एक टक्क्यांपेक्षा कमी आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाकडून या अपुष्प वर्गीय वनस्पतींवरील संशोधनाचा वारसा जपण्याचे काम सुरू आहे. प्रा. डॉ. मीना डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे विद्यार्थी डॉ. सचिन पाटील, डॉ. राजेंद्र लवटे, डॉ. मंदा घाटगे, डॉ. संजय मगदूम यांचे संशोधन सुरू आहे. यासाठी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. व्ही. गुरव यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

### औषधी गुणधर्म

- पॉलिट्रायकम मॉसच्या काढ्याद्वारे मूतखडा, पित्ताचे खडे काढले जातात
- स्पॅगनम मॉसपासून कार्बनीयुक्त पदार्थांचा (पीट) वापर ज्वलनासाठी
- कावीळ, हृदयरोग, सर्दी-ताप-खोकला, जखम बरी करण्यासाठी
- मार्केन्शिया पॉलिमॉर्फाचा उपयोग फुफ्फुसाच्या क्षयरोगावर
- मातीतील पाण्याची क्षमता वाढण्यासाठी पीट मॉसचा वापर
- स्पॅगनम मॉसमधील स्पॅगेनॉल रसायन त्वचारोग निदानासाठी
- स्पॅगनम मॉसचा काढा डोळ्यांच्या आजारावर उपयुक्त
- ॲन्टीबायोटिक्सची निर्मिती

“ पश्चिम घाट आणि परिसरासाठी मॉसेस महत्त्वाची आहेत. यासाठी झाडेझुडपे, जंगले, पाणी, माती, दगडांची जपणूक केली तरच मॉसेस टिकतील. जमिनींवर वाढणारे ‘टेरिक्युल्स’, ओलसर दगडांवरील ‘सॅक्सीक्युल्स’, वनस्पतींच्या खोडांवरील ‘ईपीक्युल्स’ तर वनस्पतींच्या पानांवर वाढणाऱ्या मॉसेसना ‘लिपीक्युल्स’ म्हणतात. हे सर्व प्रकार आपल्या परिसरात आढळतात.

**-डॉ. सचिन पाटील**

तरुण भारत

# नॅक मूल्यांकनाची आता श्रेणी नाही

**पुणे :** देशातील उच्च शैक्षणिक संस्थांना आता नॅक मूल्यांकनांतर्गत श्रेणी दिली जाणार नाही. तर फक्त मूल्यांकन झाले किंवा नाही एवढेच पाहिले जाणार असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जून २०२४ पासून ही मूल्यांकन प्रक्रिया लागू होणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मध्ये नॅक, एन. बी. ए., एन. आय. आर. एफ. अशा सर्व मूल्यांकन संस्थांच्या प्रक्रियेमध्ये समानता अथवा बदल करण्याचे प्रस्तावित होते. समितीचा अहवाल मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी स्वीकारला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2024
तरुण भारत

# भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णसह रजत पदक

■ शिवाजी विद्यापीठातील मुलींच्या रग्बी संघाची कामगिरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

चंदिगढ विद्यापीठ मोहाली(पंजाब)येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रग्बी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या दोन्ही रग्बी संघाने 7 SSIDE क्रीडा प्रकारामध्ये सुवर्ण पदक तर 15 SSIDE क्रीडा प्रकारामध्ये रजत पदक पटकावले. अखिल भारतीय अंतर विद्यापीठ रग्बी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे नाव उंचावले. तसेच ७ एर्ड्ज प्रकारामधील मुलींच्या संघाची निवड २१ ते २३ फेब्रुवारी २०२४ दरम्यान गुवाहाटी (आसाम) या ठिकाणी होणाऱ्या खेलो इंडिया विद्यापीठ राष्ट्रीय रग्बी स्पर्धेसाठी झाली आहे. या संघाचे प्रशिक्षक म्हणून दीपक पाटील व प्रा. राहुल लहाने तर संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. संग्रामसिंह मोरे व प्रा. अर्जुन पिटुक आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सुवर्ण व रजत पदकांची कमाई केलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या दोन्ही रग्बी संघांचे खेळाडू.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2024
तरुण भारत

# न्यू ज्यूदो कराटे केंद्राचे यश

प्रतिनिधी
कोल्हापूर

मंगळवार पेठ येथील न्यू ज्यूदो प्रशिक्षण केंद्रातील खेळाडूंनी जिल्हास्तरीय व आंतर विद्यापीठ ज्यूदो स्पर्धेत यश मिळवले. जिल्हास्तरीय स्पर्धेत बारा सुवर्ण, आठ रौप्य, सहा कास्यपदके मिळवले.

स्पर्धेत सई मुळीक, रविश खटावकर, ध्रुव बोंगाळे, लावण्या पाटील, प्रज्ञा मुळीक, दिपा कुलकर्णी, क्रिश मुकंदन, अनमोल पालकर, अवधूत पाटील, देवयानी पाटील, प्रज्वल यादव मिहिका प्रभुलकर यांनी सुवर्ण पदक व राम सुर्यवंशी, श्रीशा झावरे, विश्वराज क्षीरसागर, मनवा प्रभुलकर, मनस्वी यादव, तपश्या यादव, तनुजा जाधव, सर्वांगी पाटील, आदिती सुर्यवंशी यांनी रौप्य पदक व दर्शन पोवार, दर्शन रायजाधव, संस्कार रायजाधव, ईशान विसापूरकर, ऋग्वेद कळंत्रे यांनी कास्यपदक मिळवले. खेळाडूंना प्रशिक्षक शरद पोवार, आकाश चिले, लालासो गायकवाड यांचे मार्गदर्शन मिळाले.



कोल्हापूर : न्यू ज्यूदो प्रशिक्षण केंद्रातील यश संपादन केलेले विद्यार्थी सोबत प्रशिक्षक.

## चार खेळाडूंची आंतर-विद्यापीठ ज्यूदो स्पर्धेत निवड

आंतर-विभागीय महाविद्यालयीन ज्यूदो स्पर्धेत अवधूत पाटील (६६ किलो), आदित्य पाटील (९०किलो), सौरभ वाली (१०० किलो), सानिका गायकवाड (७८ किलो) यांनी सुवर्णपद मिळवले. अनमोल पालकर (६६ किलो) आकाश चिले (८) किलो) वजनगरान रौप्यपदके मिळवले. त्यांची विद्यापीठ ज्यूदो स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ ज्यूदो संघात निवड झाली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी-विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2024
पुढारी



कोल्हापूर : आंतरविद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठीच्या शिवाजी विद्यापीठ संघात न्यू ज्युदो प्रशिक्षण केंद्राच्या चौघांची निवड झाली आहे. यात सुवर्णपदक विजेते अवधूत पाटील (६६ किलो), आदित्य पाटील (९० किलो), सौरभ वाली (१०० किलो), सानिका गायकवाड (७८ किलो) यांचा समावेश आहे. निवडीसाठीच्या आंतरविभागीय स्पर्धेत आकाश चिले (८१ किलो) याने रौप्यपदकाची कमाई केली. सर्वांना प्रशिक्षक शरद पोवार, अध्यक्ष लालासो गायकवाड आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2024
पुढारी

# अनुष्का भोसले, धैर्यशील भोसलेची राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड



अनुष्का भोसले



धैर्यशील भोसले

कोल्हापूर : कट्टानकुलाथुर (चेन्नई) येथे होणाऱ्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठीच्या शिवाजी विद्यापीठ संघात अनुष्का किरण भोसले व धैर्यशील किरण भोसले यांची निवड झाली आहे. अनुष्का शिवाजी विद्यापीठाच्या एम.एस.सी. (गणित) विषयाच्या प्रथम वर्गात, तर धैर्यशील डी.ओ.टी. (सिव्हिल इंजिनिअरिंग) विषयाच्या प्रथम वर्गात शिकत आहे. दोघांना प्रशिक्षक प्रभाकर डांगे, महेश पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. एस. एन. सपली, प्रा. शरद बनसोडे, प्रा. सुनील खराडे आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JAN 2024
लोकमत

नवे शैक्षणिक धोरण

# नव्या शैक्षणिक धोरणाचे 'मूल्य' जाणा

## डॉ. तेजस्विनी मुडेकर : कौशल्यावर भर

कॉलेज कॅम्पस

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भारतीय परंपरेची सांगड घालतानाच रोजगाराभिमुख कौशल्य, आधुनिकीकरण, वैज्ञानिक या मूल्याधिष्ठित शिक्षणाला नव्या शैक्षणिक धोरणात महत्त्वाचे स्थान दिले आहे. यामुळे विद्यार्थी परिपूर्ण घडेलच, पण त्याच्या करिअरच्या वाटाही अधिक सोप्या होतील, असा विश्वास ताराराणी विद्यापीठ संचालित कमला कॉलेजच्या प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी व्यक्त केला. नवे शैक्षणिक धोरण, अंमलबजावणीतील अडथळे, क्रेडिट पद्धत यावर डॉ. मुडेकर यांनी सविस्तर मांडणी करताना भौतिक सुविधांकडेही लक्ष वेधले.

डॉ. मुडेकर म्हणाल्या, १९६८ व १९८६ नंतर प्रथमच देशात नवीन शैक्षणिक धोरण आणले आहे. स्वायत्त महाविद्यालयांपासून त्याची अंमलबजावणी केली आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा दृष्टिकोन समोर ठेवून हे धोरण आणले आहे. सर्व विद्याशाखांमधील विषय शिकण्याची संधी यात दिली आहे. त्यामुळे यात विद्यार्थी सर्वार्थाने परिपूर्ण होण्यास मदत होणार आहे. सध्याच्या काळात विद्यार्थ्यांना मूल्य शिक्षणाची नितांत गरज होती. नेमका हाच धागा या नवीन धोरणात समाविष्ठ आहे. भारतीय परंपरा आणि त्याचे ज्ञान विद्यार्थ्यांना होणे आवश्यक आहे. ती कसर या नवीन शैक्षणिक धोरणात भरून काढली आहे. त्यामुळे मूल्याधारित शिक्षणाचे महत्त्व जाणून नवीन शैक्षणिक धोरणाचा स्वीकार करणे गरजेचे आहे. पूर्वी खेळ किंवा सांस्कृतिक उपक्रमातील सहभागाचे गुण ग्राह्य धरले जात नव्हते. मात्र, या धोरणात क्रेडिट पद्धतीच्या माध्यमातून हे गुण संबंधित विद्यार्थ्यांना मिळणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव तर मिळेलच, पण क्रेडिट मिळणार असल्याने त्यांना प्रोत्साहनही मिळेल. नवे धोरण आखताना कौशल्य विकासावर अधिक भर दिला आहे. त्यामुळे कौशल्याधिष्ठित विद्यार्थी घडणार आहेत. शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांना ऑन फील्ड ट्रेनिंग घ्यावे लागणार आहे.



### सुविधांचे काय?

मेजर व मायनर विषय पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे विषय शिकण्याची संधी मिळेल, मात्र, यामुळे महाविद्यालयांमध्ये पायाभूत सुविधांचा प्रश्न उभा राहिला आहे. या ऐच्छिक पद्धतीमुळे विद्यार्थ्यांसाठी वर्गखोल्या वाढवाव्या लागतील, प्राध्यापकांची संख्या वाढेल. त्यामुळे पायाभूत सुविधा देणे क्रमप्राप्त बनेल. वेळापत्रक बनविणे, त्यानुसार कामकाज सुरु ठेवणे आव्हान असल्याचे डॉ. मुडेकर यांनी सांगितले.

### रोजगाराभिमुख शिक्षणाला प्राधान्य

नव्या शैक्षणिक धोरणात रोजगाराभिमुख शिक्षणाला अधिक प्राधान्य दिले असले तरी कमला कॉलेजने ही गरज फार पूर्वीच ओळखून कॉलेजमध्ये रोजगार विषयक अनेक कोर्स सुरु केल्याचे निदर्शनास आणून दिले. ब्यूटी स्किल, ब्यूटी थेरपी, मेकअप, मेंदी, कुकीज यासारखे विविध प्रमाणपत्र कोर्स कॉलेजमध्ये सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.